महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे



महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!

पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.

✻ संपादक ✻

मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१



RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. –१६१ ■ गुरूवार दि. ९ जानेवारी २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४


## तलाठ्यासह दोघे ५ हजाराच्या लाच प्रकरणी एसीबीने पकडले

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**जळगाव/प्रतिनिधी :–** काकोडा येथील तलाठी प्रशांत ढमाळेसह खासगी इसम अरूण भोलानकर, संतोष उबरकर हे पाच हजाराच्या लाच प्रकरणात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले सून मुक्ताईनगर पोलीस स्टेशनमध्ये तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार यांचे आजोबा यांचे नावे कुऱ्हा ता. मुक्ताईनगर येथे शेत गट क्र.१६७/१८ असा असुन तक्रारदार यांचे आजोबा हे सन १९९७ मध्ये मयत झाले आहे. तेव्हा पासुन तक्रारदार यांचे वडील, काका, आत्या व मयत काकांच्या मुलांचे यांचे ७/१२ उताऱ्यावर नाव लावणे बाकी होते. त्यासाठी तक्रारदार यांनी मागील ७ ते ८ दिवसापूर्वी कुऱ्हा गावातील तलाठी याची भेट घेतली असता यातील आलोसे क्रमांक १ यांनी तक्रारदार यांना तुम्हाला प्रत्येक वर्षाचे २२० रुपये या प्रमाणे ६००० रुपये शासकीय फी भरावी लागेल, जर तुम्हाला शासकीय फी भरायची नसेल तर मला ५००० रुपये द्यावे लागतील असे सांगितले होते त्या बाबत यातील तक्रारदार यांनी दिनांक ०१/०१/२०२५ रोजी ला. प्र. वि. जळगांव घटकांकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची दिनांक ०१/०१/२०२५ रोजी पडताळणी केली असता यातील आलोसे क्रमांक १ व आरोपी क्रमांक २ यांनी तक्रारदार यांचे ७/१२ उताऱ्यावर त्याचे वडील, काका, आत्या व मयत काकाच्या मुलाचे नाव लावण्याचे मोबदल्यात ५०००/–लाचेची मागणी केली होती. त्यानंतर आज दिनांक ०८/०१/२०२५ रोजी सदर लाच रक्कम आरोपी क्रमांक २ यांचे सांगणे वरून आरोपी ३ यांनी ५००० रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारताना त्यांना रांगेहाथ पकडण्यात आले असून त्यांचेवर मुक्ताईनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे.

श्रीमती शर्मिष्ठा घारगे–वालावलकर मॅडम, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर, जळगांव, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक नेत्रा जाधव, सापळा पथक GPSI दिनेशसिंग पाटील, पोकॉ/प्रदिप पोळ, पोकॉ/प्रणेश ठाकूर पोकॉ/सचिन चाटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## तहसिल कार्यालयावर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मालेगाव –:** तालुक्यातील उंबरदे, मळगाव ,कळवाडी, नरडाणे, देवघट व पंचक्रोशीतील रहिवाशांना शासकीय कामासाठी आवश्यक असलेले जातीचे दाखले व शिधापत्रिका मिळत नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनांपासून वंचित राहवे लागत आहे.या संदर्भात महसूल विभागाशी सातत्याने अर्ज, निवेदन देत याचना करूनदेखील, अद्याप पर्यंत गोर–गरीब नागरिकांना शिधापत्रिका व जातीचा दाखला मिळाला नाही.या संदर्भात तहसील कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर सदरचे आवश्यक दाखले उपलब्ध करून देत नसल्याच्या निषेधार्थ आज लोकशाही धडक मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष शेखर पगार यांच्या नेतृत्वाखाली सकाळी बारा वाजता तहसील कार्यालयावर जाऊन तब्बल दोन तास शोले स्टाईल आंदोलन छेडण्यात आले.

उंबरदे, मळगाव, कळवाडी, नरडाणे ,देवघटसह पंचक्रोशीतील गोर–गरीब आदिवासी नागरिकांकडे शासनाच्या योजनांसाठी आवश्यक असलेली जा–तीचे दाखले, शिधापत्रिका,मतदान ओळखपत्र,आधार कार्ड, शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्र नसल्यामुळे त्यांना नेहमीच या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. तब्बल १००



वर्षापासून रहिवासी असलेल्या गोरगरीब आदिवासीना सदरचे दाखले मिळत नाही. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष होऊन देखील या गरिबांना अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. बहुतांश ग्रामस्थ अशिक्षित असल्यामुळे त्याचा फायदा उ उठवत आठ ते दहा हजार रुपयाची मागणी करतात.सदर दलाल हे पैसे घेऊन काही दिवसातच परागंधा होत असल्यामुळे गोरगरिबांची फसवणूक होत असल्याची तक्रार पगार यांनी नमूद केली आहे. उपरोक्त कागदपत्र नसल्यामुळे नारीकांना शबरीमाता घरकुल योजना, रमाईमाता घरकुल, मोदी घरकुल,व कृषी विभागाशी निगडित तसेच ईतर शासकीय योजनापासुन वंचित रहावे लागत आहे, याबाबत महसूल यंत्रणेकडे वर्षानुवर्ष चकरा मारून देखिल जातीचे दाखले व रेशनकार्ड मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात वरिष्ठ अधिकारी सकारात्मक निर्णय घेऊन तत्काळ सदरची कागदपत्र उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी पगार यांच्यासह नागरिकांनी यावेळी केली . लवकरात लवकर वरील आवश्यक कागदपत्र त्वरित उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वासन प्रांत अधिकारी नितीन सदगीर यांनी दिल्याने सदर आंदोलन मागे घेण्यात आले .या आंदोलनात शेखर पगार यांच्यासह सुखदेव दळवी, रमेश पवार, भारत गांगुर्डे, सुमनबाई सोनवणे, कलाबाई दळवी, धनाबाई कुवर, शिवाजी पवार आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हजार रुपये लाच घेताना नगरसुलचा तलाठी बापू पवार लाचलुचपत च्या जाळ्यात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे, राजापूर/प्रतिनिधी :–** येवला तहसील अंतर्गत नगरसुल येथे तलाठी म्हणून सेवेत असलेला व कुसमाडी येथील अतिरिक्त कार्यभार सांभाळणारा बापू वामनराव पवार, वय ५४ वर्ष, यास वडिलोपार्जित शेतजमीन मुलाच्या नवे केली, त्याची नोंद होणे कामी १ हजार रुपये लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले असून, त्याला अटक करण्यात आली आहे.



यातील तक्रारदार यांनी त्यांचे वडिलोपार्जित शेत पत्नी व मुलाच्या नावे दुय्यम निमधक यांचेकडे दस्त नोंदणी केली होती. त्याची नोंद ७/१२ उताऱ्यावर लावण्यासाठी तक्रारदार यांनी तलाठी पवार यांचेकडे दिली होती. परंतू सदरची नोंद मुलाचे नाव चुकल्याने रद्द झाली होती. ती दुरुस्त करून ७/१२ उताऱ्यावर नोंद घेण्यासाठी तलाठी पवार यांनी त्यांच्यासाठी १००० रुपये व मंडळ अधिकारी यांचेसाठी ५०० रुपये लाचेची मागणी करून नोंद करण्यासाठी प्रथमतः १००० रुपये लाच स्वतःसाठी स्विकारली असता, रंगे हाथ पकडण्यात आले असुन, त्याच्या विरुध्द येवला तालुका पो–लीस स्टेशनं, नाशिक ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,७र अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पो–लीस अधीक्षक ला. प्र. वि. नाशिक परी–क्षेत्र नाशिक शर्मिष्ठा घारगे – वालावलकर' यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा पथक' पो. हवा शरद हेंबाडे, पो. ना युवराज खांडवी, चापो हवा विनोद पवार यांनी कारवाई केली.

## बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात अज्ञात साथीच्या आजाराने नागरिकांच्या डोक्यावर पडत आहे टक्कल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई/प्रतिनिधी –:** राज्यात आरोग्य प्रशासनने चीनमध्ये आलेल्या विषाणूमुळे अलर्ट मोडवर आहे. दुसरीकडे बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात काही गावांमध्ये एका विचित्र आजाराच्या साथीमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वा–तावरण पसरल्यासचे दिसून येत आहे. बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, हिंगणा गावांमध्ये तीन दिवसांमध्ये अनेकांच्या डोक्यावरचे केस गेल्याने परीसरातील नागरिकांमध्ये या नवीन रोगामुळे दहशत निर्माण झाली. याप्रकरणी आरोग्य विभागाने गावात धाव घेत आरोग्याचे सर्वेक्षण सुरू केले. परंतु हा नेमका काय प्रकार आहे हे अद्याप समजू



शकले नाही.

५० हून अधिक व्यक्तींना अचानक केस गळती होऊन , नंतर काही दिवसात त्यांची टक्कल पडत असल्याने नागरिक भयभीत होत आहे. हा अज्ञात आजार नेमका कोणता आहे, याबाबत सर्वत्र चर्चा असून, एकच खळबळ उडाली आहे. तर गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. त्यामुळेच आता बोंडगाव, कालवड, हिंगणा या गावात अज्ञात आजाराने थैमान घातल्याचे समोर आले. गावातील कुटुंब या व्हायरसचे बळी ठरत आहेत.

**✻ सर्वेक्षणात आढळले ३० पेक्षा जास्त बाधित :**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने बोंड गावात सर्वेक्षण केले, त्यामध्ये केस गळतीच्या आजाराने ३० जण बाधित असल्याची माहिती आहे. याबाबत पुढील उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभागाचे पथक गावात दाखल झाले असून, त्यांच्याकडून रुग्णांची लक्षण आणि उपचार सुरू करण्यात येत आहे.

## आदिवासी महिलेचा विनयभंग, मारहाण व शिवीगाळ प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी –:** मरळगोई बु.येथे आदिवासी महिलेचा विनयभंग, तिच्या पतीस मारहाण व शिवी–गाळ प्रकरणी दोघा आरोपींच्या विरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी महिला वय २५ हिने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी यांची शेतजमीन व विहिर फिर्यादीचे शेताचे लगत गोई नदीचे किनारी आहे व ते एकमेंकाच्या शेजारी राह–तात. दि.१२ डिसें २०२४ रोजी सकाळी ९.३० च्या वेळेस फिर्यादी घरासमोर अंगणात साडीने बनवेलेले बाथरुम मध्ये आंघोळ करत असतांना साडी कोणीतरी बाजुला केल्याचे दिसले, तेव्हा फिर्यादीने डोकावुन पाहिले असता आरोपी रोहित खंडू जगताप हा उभा होता. त्यास फिर्यादी म्हणाली की, 'तु तेथून निघुन जा, माझा नवरा घरी नाही आणी तु माझ्या आंघोळीच्या टाईमाला येत जाऊ नको' तरीही त्याने वाईट नजरेने फिर्यादीकडे पाहुन, फिर्यादी अंगाला साडी गुंडाळुन घाबरुन घरात गेली असता तिचे मागे जावुन पकडुन तिचे छातीस हात लावुन तिस लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन तिचा विनयभंग केला. तेव्हा फिर्यादीच्या ओरडणयाचा आवाज ऐकुन जवळच शेतात लाकडे तोडत असलेला फिर्यादीचा पती हा धावत येवुन त्याने आर–ोपीस विचारले की, 'तु येथे माझी पत्नी आघोंळ करत असतांना का आला ?' असे बोलत असतांना आरोपी खंडू दिगंबर जगताप याने तेथे येवुन संगनमताने, 'तुला जास्त माज आला आहे' असे बोलून फिर्यादीच्या पतीची गच्ची पकडून हाताचे चापटीने मारहाण करुन फिर्यादी व साक्षीदार पती हे अनुसुचित जाती जमातीचे आहेत असे माहित असतांना देखील तुम्ही .. लोक जास्त माजले आहेत अशी जातीवाचक शिवीगाळ करुन हाताचे चापटीने मारहाण केली. तुम्ही पोलीस ठाण्यात आमच्या विरोधात गेले तर तुमचा काटाच काढुन टाकू अशी धमकी दिली अशी फिर्याद दिली आहे. तिच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात गु.र.न ०८/२०२५ भारतीय न्यासंहिता ७४,७८,१५ (२) ३५२,३५१ (२) ३५१ (३),३(५) अनुसुचित जमाती (अत्याचार) वैधानिक कायदा २०१५ चे क.३(१)(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनास्थळी निफाड पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश पालवे, स.पो.नि.भास्कर शिंदे, पो.ऊ.नि.पवन सुपनर यांनी भेट दिली असून अधिक तपास उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश पालवे करीत आहेत.


महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

आवाज

संपादक : भगवान सोनवणे

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना – १४९९/– रु.

तीन महिने – २४९९/– रु.

सहा महिने – ५४९९/– रु.

✻ संपादक ✻

मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

# नात्यात मनापासून प्रेम हवे..!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

एक लहान मुलगी अंब्राहम लिंकन, जे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते यांच्याबद्दल वाचत होती. ते कसे दिसत असावेत याबद्दल तिच्या मनामध्ये विचार आला. आणि तिने तिचा वडिलांना ते विचारले, तिचे वडिल म्हणाले, बाळ अध्यक्ष लिंकन दिसायला फारसे चांगले नसलेले ग्रहस्थ साहेब, तिच्या डोक्यात त्याच्यामुळे त्यांची प्रतिमा तशीच राहीली. पण त्याचवेळी त्यांच्याबद्दल वर्तमानपत्रामध्ये जे काय चांगल लिहून आले होत . ते ही तिच्या मनामध्ये तसच ठासून राहीलं होतं. एके दिवशी तिने फारच आग्रह केला म्हणून तिच्या वडिलांनी तिला अध्यक्ष लिंकन कसे आहेत हे दाखविण्यासाठी व्हाईट हाऊसमध्ये नेले. लिंकननी तिला आपल्या मांडीवर घेतले आणि ते तिच्याशी नेहमी प्रमाणे आपल्या हळूवार आणि मृदू आवाजात बोलू लागले. त्या मुलीने आपल्या वडिलांना आवाज देऊन बोलावले. आणि त्याला म्हणाली, बाबा, मी आजपर्यंत पाहीलेल्या सगळ्या व्यक्तीमध्ये हे सर्वांत सुंदर आहेत. असं नात हे सर्वांत सुंदर नातं. पण येथे हे विश्व एक मायाजाल आहे. या मायाजालात आपलं नात अनेकांशी असत. नात्यामध्ये आई बाबा, काका, काकू, भाऊ, बहिण, मित्र, शेजारी, पशू, पक्षी, प्राणी यांच्याशिही नात असतं. परंतू प्रत्येक नात मनापासून केलेलं आहे अस म्हणता येत नाही. काही नाते असे असतात. ते आपल्याला गोत्यात आणण्याचा प्रकार करतात. नातं किती जूण आहे याच्यावरही नात टिकत नाही. त्याच्यासाठी हृदयाचा नसा नसा मध्ये प्रेम असावं लागत. या प्रेमा मध्येही भावनिक प्रेम सर्वाधिक स्पर्श करुन जाणारं असते.एकदा एक आई स्वयंपाक करत होती तिला लहानसं रांगणार बाळ होत. ती - स्वयंपाक करत होती. तीने त्या लहान बाळाला तिथचं जवळपास खेळायला सोडून दिल. तेवढ्यात ते बाळ रांगत रांगत ओट्यावर चाललं गेल. ओट्यावरुन ते बाळ पडणार, तेवढ्यात आईला स्वयंपाक करतांना हृदयातून आवाज आला की बाळ तशीच ओट्यावरुन पडणार. ती त्याच क्षणाला धावत धावत जाते आणि बाळाला उचलून होत, घेते. त्याला खाली पडल्यापासून वाचविते. आणि सुटकेचा विश्वास सोडते. असा अंर्तआत्म्यातून आवाज आला पाहीजे. तेव्हा ते नात पवित्र समजल जातं. समोरच्यावर प्रेम करावयाच असेल तर तेवढच प्रेम आपल्या हृदयात असायला पाहीजे. म्हणून साने गुरुजी सारखे मातृहृदयी लोकासारखे लोक शोधून सापडत नाही. म्हणून मला सांगावसं वाटतं - । नात किती जून, यावर प्रेम नाही टिकत, नात टिकायला प्रेमाची खोली असावी लागते, कुठेही बी पेरल्यावर झाड नाही उगवत, जमीन मुळात ओली असावी लागते ।



यशवंत निकवाडे, शिरपूर

# समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पत्रकारांची भूमिका मोलाची - आमदार सत्यजित तांबे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक -** सध्याच्या प्रचंड महागाईच्या काळात वर्तमानपत्र चालविणे ही अत्यंत आव्हानात्मक गोष्ट आहे, परंतु पत्रकारांनी चांगल्या व सकारात्मक बातम्या देऊन आपली पत्रकारिता सुरू ठेवावी , वंचित ग्रामीण आदिवासी दलित मागासवर्गीय घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम पत्रकारच करू शकतो , आपली छोटी बातमी देखील जनतेचा आवाज बनू शकते . सर्वच घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी व समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पत्रकारांची भूमिका मोलाची आहे , असे प्रतिपादन आमदार सत्यजित तांबे यांनी केले .

श्री कालिका देवी मंदिर संस्था नाशिक यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त कै. कृष्णाराव पाटील कोठावळे स्मृती पत्रकार सत्कार व पुरस्कार गौरव सोहळा रविवार दि. ५ जानेवारी रोजी श्री कालिका मंदिर सभागृह , जुना आग्रा रोड नाशिक येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी आ. तांबे बोलत होते . या प्रसंगी दैनिक साईमत चे शहर प्रतिनिधी तुषार जाधव यांचाही सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सत्यजित तांबे उपस्थित होते. तर यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री कालिकादेवी मंदिर संस्थानचे अध्यक्ष अण्णासाहेब तथा केशवराव पाटील उपस्थित होते . तसेच व्यासपीठावर डॉ. प्रतापराव कोठावळे, काँग्रेसचे कार्यकर्ते ज्ञानेश्वर गायकवाड उपस्थित होते . यावेळी पत्रकारांना मार्गदर्शन करताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की , आपल्या देशात लोकशाहीचे चार स्तंभ असून या चारही



ठेवावी. वंचित , ग्रामीण , आदिवासी , दलित , मागासवर्गीय घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम पत्रकारच करू शकतो. असेही ते म्हणाले.

तसेच आपली छोटी बातमी देखील जनतेचा आवाज बनू शकते, या बातमीमुळे आम्ही म्हणजे लोकप्रतिनिधी आमदार व खासदार संसदेत व विधिमंडळात प्रश्न मांडू शकतो . त्यातून त्याचे कायद्यात रूपांतर होऊ शकते आणि जनतेला न्याय मिळू शकतो . यामुळे पत्रकारांची समाजासाठी खूप मोठी भूमिका आणि योगदान असते, असेही त्यांनी सांगितले. आज सर्व क्षेत्रात थोडी वाईट माणसे असल्यामुळे सर्वच क्षेत्र बदनाम होत आहे . मात्र चांगली माणसे समाजात आहे म्हणूनच चांगले कार्य घडत असते . श्री कालिकादेवी मंदिर संस्थानच्या वतीने ही नेहमीच धार्मिक , सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात मोठे योगदान लाभत आहे . पत्रकारांसह महिला , शिक्षक , सामाजिक कार्यकर्ते यांचा सत्कार आणि गौरव देखील श्री कालिकादेवी संस्थान मंदिर संस्थांनच्या वतीने करण्यात येतो . यासाठी अण्णासाहेब केशवराव पाटील यांचे मोठे योगदान आहे , असे त्यांनी यावेळी सांगितले .यावेळी केशवराव पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नाशिक शहर व जिल्ह्यातील पत्रकारांचा स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन व फेटा बांधून सत्कार करण्यात आला .

**यांना मिळाले पुरस्कार -** रेवनाथ जाधव ,गोकुळ खैरनार, मुकुंद बाविस्कर , चंद्रशेखर गोसावी, अमोल निरगुडे , सुशांत किरवे, तुषार जाधव , करणसिंग बावरी , शंकर वाघ, किरण कुमार आवारे, नरेंद्र देसले ,प्रसाद गुबी, उमेश देशमुख, दीपक सोनवणे, समीर पठाण, राजेंद्र शेलार, विकास गीते, केशव डोन्नर, भगवान गायकवाड ,प्रशांत दोशी, सुनील डोंगरे ,प्रमोद तुपे ,केटी राजोळे, सुनील काळे, भगवान सोनवणे, किरण कवडे ,मनोज मालपाणी ,तुषार जाधव, संतोष भारस्कर, जमीर शेख, दत्ता जाधव, सुशांत किरवे, अन्सारी खलील अब्बास, शबनम आदिल , हर्षल गांगुर्डे , गणेश शेवरे , पांडुरंग धुंदे , देवचंद महाले , भीमाशंकर अहिरे , हिरामण चौधरी , कल्पेश लचके , बंडू जगदाळे , संदीप तिवारी, संदीप जेजुरकर , संतोष कांडे ,दीपक सोनवणे ,दिगंबर पाटोळे, समाधान शिरसाट, विलास सूर्यवंशी ,मनोहर घाटोळे, चंद्रकांत भालेराव, चंद्रकांत धात्रक ,अनिल गांगुर्डे , वैभव पवार , सुनील बिरार .

# सरस्वती विद्यामंदिर लासलगाव शाळेमध्ये पत्रकार दिनी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी-:** बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनाचे औचित्य साधून सरस्वती विद्यामंदिर शाळेमध्ये पत्रकारांच्या पत्रकारितेला समर्पण भावनेने प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले .प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये वर्ग स्तरावर पात्रता फेरीतून पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेमध्ये मनस्वी ठोंबरे, स्वराज जाधव ,लक्ष्मी सोनवणे, ओंकारेश्वरी गाढे, बञ्मिन शेख, वेदांत कदम, अर्णव पातळे, आर्यन बागुल या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी स्पर्धेमध्ये अर्णव कैलास पातळे व आर्यन दिनेश बागुल या विद्यार्थ्यांनी सर्वात जास्त गुण मिळवत स्पर्धेत विजयी होण्याचा मान मिळविला. विजयी स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष जगदीश होळकर ,उपाध्यक्ष सुलेमान मुलांनी, सचिव गुणवंत होळकर ,संचालक बाळासाहेब बोरसे, डॉ. विकास चांदर, सुनील शिंदे,



पालक एन. के. अहिरे व उगले बाबा यांनी गुणगौरव करत विशेष अभिनंदन केले. मुख्याध्यापक भीमराव शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करत स्पर्धेच्या युगात आपली ज्ञानाची कक्षा कशाप्रकारे वाढवावी हे सांगत शुभेच्छा दिल्या. प्रश्नमंजुषा स्पर्धेचे नियोजन मोहन नाईक , वर्षा गुंजाळ व हर्षाली रसाळ यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप ठाकरे यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र महाले,सुनील आव्हाड ,कैलास पातळे ,संदीप सूर्यवंशी, नवनाथ जिरे, कांचन शेलार, धर्मेंद्र निकम, रूपाली शिंदे, सोनाली होळकर, स्वप्निल अहिरे,कविता अत्तरदे ,रूपाली दिवटे, दिपाली शेळके, सोनाली बागुल ,तुषार फेगडे आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी-:** सरस्वती विद्या मंदिर लासलगाव शाळेमध्ये दिव्यांग अर्थात विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास पातळे यांनी केले. या स्पर्धांसाठी शाळेतील शिक्षक सुनील आव्हाड, संदीप सूर्यवंशी, नवनाथ जिरे, कांचन शेलार ,धर्मेंद्र निकम, रूपाली शिंदे, मोहन नाईक, सोनाली होळकर, प्रदीप ठाकरे, स्वप्निल अहिरे, कविता अत्तरदे ,रूपाली दिवटे ,वर्षा गुंजाळ, सोनाली बागुल, हर्षाली सोनवणे, तुषार फेगडे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# ए.आय.तंत्रज्ञानामुळे युवा भारतात रोजगाराची त्सुनामी: प्रा.किरणकुमार जोहरे यांचे प्रतिपादन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी-:** आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे (ए.आय.) युवा भारतासह जगभरात रोजगाराच्या अमर्याद संधीची त्सुनामी येत असून, सध्या ९.५ कोटी ए.आय.आधारित रोजगार असतानाही तज्ज्ञांची टंचाई भासत आहे. योग्य प्रशिक्षकांच्या अभावामुळे लाखो रुपये खर्च करूनही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. सरकारने २०२५ हे 'ए.आय. वर्ष' घोषित केले आहे. हॉटेल्स, हॉस्पिटल्स, शाळा, संरक्षण, आणि टेलिव्हिजनसारख्या क्षेत्रांत ए.आय.रोबोट्स आणि कोबोट्सची मागणी झपाट्याने वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात सर्वाधिक जागतिक रोजगार उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ए.आय. रोबोट्सशी स्पर्धा करत स्वतःचा मार्ग शोधला पाहिजे, असे प्रतिपादन ए.आय. तज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी केले.

मविप्र समाजाच्या कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने, लोणवाडी गावात आयोजित रासेयो शिबिरप्रसंगी 'आजचा युवा आणि ए.आय. डिजिटल साक्षरता' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, प्रा. संपतराव खैरनार, प्रा. अजित देशमुख, प्रा. राजेंद्र खांडगे आदी उपस्थित होते. प्रा. किरणकुमार जोहरे पुढे म्हणाले, सध्याचा अभ्यासक्रम कालबाह्य झाला असून, दर तीन महिन्यांनी तो अद्ययावत





करणे अपरिहार्य गरजेचे आहे. भविष्यात शैक्षणिक संस्थांचे स्वरूप बदलेल व कस्टमाईझ ए.आय. रोबोट्स शिक्षक घरोघरी शिकवतील. शिक्षकांनीही ए.आय.चा उपयोग आपल्या विषयांसाठी करायला हवा, ए.आय. चाकूसारख्या शस्त्राप्रमाणे आहे. योग्य वापराने भाजी कापता येते, तर चुकीच्या वापराने हानी होऊ शकते. विद्यार्थ्यांनी ए.आय.चा सकारात्मक वापर करून आत्मनिर्भर भारत घडवावा, असे ते म्हणाले. त्यांनी ए.आय.च्या उपयोगामुळे आर्टस, कॉमर्स, कृषी, बँकिंग, मॅनेजमेंट, सायन्स, आणि मेडीकल क्षेत्रात होणाऱ्या संधींबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संपतराव खैरनार यांनी, सूत्रसंचालन प्रा. अजित देशमुख यांनी, आणि आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र खांडगे यांनी केले. यावेळी प्रा. सायली साबळे, प्रा. मेघा रायते, प्रा. डॉ. छाया भोज, प्रा. निशांत वडघुले, प्रा. उषा कदम, व विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# गणित विज्ञान प्रदर्शनात बनकर वस्ती शाळेचे सुयश!




**दै. आवाज वृत्तसेवा...**

**कोपरगाव** – कोपरगाव तालुका ५२ वे गणित विज्ञान आणि पर्यावरण प्रदर्शन नुकतेच उत्साहात पार पडले यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनकर वस्ती ब्राह्मणगावची विद्यार्थिनी अर्पिता बाळासाहेब केकाण हिने इयत्ता पहिली ते पाचवीच्या गणित गटात द्वितीय क्रमांक पटकावला अर्पिता केकाण हिचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला तिने निपुण भारत अभियान अंतर्गत टाकाऊतून टिकाऊ गणित साहित्य पेटी हे साहित्य तयार केले होते.

मूळ संख्या त्रिकोणी संख्या जोडमूळ संख्या संख्यांची छत्री इत्यादी बाबींची माहिती देणारी ही गणित साहित्य पेटी आकर्षणाचा विषय ठरली तिला गणित शिक्षिका मनीषा जाधव व महेंद्र निकम तसेच मुख्याध्यापक श्री ज्ञानेश्वर वाकचौरे यांचे मार्गदर्शन लाभले याप्रसंगी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या सार्थक विनोद सोनवणे याचा देखील प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तिच्या या यशाबद्दल ब्राह्मण गावचे सरपंच अनुरागभाऊ येवले माजी सरपंच शोभाताई बनकर बाळासाहेब बनकर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब केकाण उपाध्यक्ष वैशालीताई मोरे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य पालक गटशिक्षणाधिकारी शबाना शेख तसेच केंद्रप्रमुख रावसाहेब लांडे आदींनी कौतुक केले आहे.

# नाशिक ग्रामीण पोलीसांकडून गत वर्षात १११७ गोवंशांची सुटका

## ग्रामीण जिल्हा पोलीस प्रशासनाची कौतुकास्पद कामगिरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव** – नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी जिल्ह्यात गोवंश जनावरांची अवैधरित्या कत्तली करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्ह्यात गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहनांमध्ये क्रुरतेने डांबुन कत्तलीसाठी वाहतुक करणारे व गोवंश जनावरांचे मांस विक्री करणाऱ्या इसमांवर वेगवेगळया पोलीस ठाणेस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**✻ एकुण केसेस ३४५**
**आरोपी संख्या ४७४**
**जप्त केलेले गोवंश जनावरे १११७**
**जप्त केलेले गोवंश मांस १६९५८**
**जप्त करणारे वाहने २७२**
**एकुण किमंत ६९४६११२५**

सन २०२४ या वर्षामध्ये नाशिक ग्रामीण घटकातील मालेगाव शहरात तसेच जिल्हा सरहद्दीवर झोडगे, जायखेडा, सुरगाणा, अभोणा, पेठ, बार्हे, हरसुल, नांदुरशिंगोटे, पाथरेफाटा, घाटनदेवी अशा महत्वाच्या ठिकाणी चेकपोस्ट लावुन गोवंश तस्करी करणाऱ्यांवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन आरोपींवर मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गोवंश जनावरांची अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतुक करणे, गोवंश मांस वाहतुक व विक्री यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये यासाठी जास्तीत-जास्त प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने सण-उत्सव कालावधीत विशेष पथकांची नेमणुक करण्यात येते. नाशिक ग्रामीण जिल्हा हद्दीत गोवंश जनावरांची तस्करी व कत्तलीचे गुन्हे दाखल करण्यात आलेल्या आरोपीतांवर प्रभारी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

# येवला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात बाल वैज्ञानिकांचे विविध अविष्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**विखरणी** – येथील श्री खंडू मामा शेलार बहुउद्देशीय ग्रामविकास संस्था संचलित लक्ष्मी इंग्लिश मिडीयम पब्लिक स्कूल, विखरणी येथे येवला तालुकास्तरावरील विज्ञान प्रदर्शनाचे उद्धघाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवातिला प्रतिमा पूजन माजी आमदार मारोतराव पवार व दीपप्रज्वलन माजी आमदार नरेंद्र दराडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार मारोतराव पवार हे होते. प्रमुख पाहुणे माजी आमदार नरेंद्र दराडे, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ साहेब यांचे स्विय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे,तहसीलदार आबा महाजन साहेब, सहाय्यक गट विकास अधिकारी पाटेकर साहेब उपस्थित होते. प्रास्ताविकातून गटशिक्षणाधिकारी कुसाळकर साहेब यांनी विज्ञान प्रदर्शनाचा हेतू स्पष्ट केला. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान प्रतिकृती उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान प्रदर्शन हे इयत्ता पहिली ते पाचवी प्राथमिक गट, सहावी ते आठवी उच्च प्राथमिक गट, तर नववी ते बारावी माध्यमिक असे तीन गटात विद्यार्थी प्रतिकृती व शिक्षक गटात प्राथमिक शिक्षक , माध्यमिक शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक या तीन गटात घेण्यात आले. प्रत्येक गटात दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवलेल्या प्रतिकृती/ उपकरणे सादर करण्यात आल्या. विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी अनेक वैज्ञानिक उपकरणे सादर केली. मान्यवरांच्या वतीने उपकरणांचे निरीक्षण करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी प्रदर्शनात मांडलेल्या जलशुद्धीकरण , पीक संरक्षण यंत्र, , स्मार्ट सिटी, चंद्रयान, हायड्रोलीक जेसीबी,शेतीपिकांसाठी उपयुक्त तोफ, सेफ्टी अलार्म,इत्यादी अनेक उपकरणांची पाहणी परीक्षकांनी केली. आपत्ती व्यवस्थापन, अन्न व आरोग्य, वाहतूक, दळणवळण, नैसर्गिक शेती इत्यादी विषय देण्यात आलेले होते .या विषयावर आधारित विविध उपकरणांची माहिती घेत विविध प्रश्न मान्यवरांनी विचारले व विद्यार्थ्यांनी आपल्या उपकरणांविषयी माहिती देत प्रश्नांची उत्तरे दिली.यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष मारोतराव पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करत विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारला पाहिजे त्याचबरोबर आपल्यात असलेल्या संशोधक वृत्तीला चालना मिळण्यासाठी अशा प्रदर्शनात जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच माजी आमदार नरेंद्र दराडे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवावा. या विज्ञान प्रदर्शनात निवड झालेल्या उपकरणांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी संधी मिळणार आहे. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री मोहन शेलार, सरपंच ज्योती शेलार ,गट शिक्षणअधिकारी कुसाळकर साहेब, विस्तार अधिकारी वाघचौरे मॅडम, मुख्याध्यापिका वनिता गायकवाड, विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष रवींद्र थळकर सर व सर्व कार्यकारिणी ,सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक तसेच सर्व विज्ञान शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी सहकार्य केले.

# हिवाळ्यात पुरेसे पाणी पिणं का महत्त्वाचे आहे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**डॉ. सुनाक्षी चौरासिया**
**आहार तज्ञ – अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक**

**नाशिक** –: हिवाळ्याचा हंगाम म्हणजे थंड वातावरण, ज्यामुळे आपण जाड उबेचे कपडे घालतो आणि आपल्या शरीराला उष्ण ठेवण्यासाठी आग पेटवतो किंवा हीटर लावून स्वतःला उष्णता देतो. एवढेच नव्हे तर शरीर उष्ण राहावे त्यासाठी गरम पदार्थांचे सेवन देखील करतो. पण आपण हिवाळ्यात पुरेसे पाणी पितो का ? तर ह्याचे उत्तर नकारार्थीच असेल, कारण हिवाळ्यात थंड हवामान असल्यामुळे लोक कामी पाणी पितात जे आपल्या आरोग्यासाठी चांगले नाही. चला तर मग आम्ही सांगत आहो की अखेर हिवाळ्यात आपल्या शरीराला पाण्याची किती आवश्यकता असते. वास्तविक जर हिवाळ्यात निरोगी राहायचे असेल तर या साठी आपल्या शरीराला हायड्रेट ठेवणे खूप आवश्यक आहे. जरी आपल्याला हिवाळ्यात घाम येत नाही पण या हंगामात कमी पाणी प्यायल्यानं अनेक समस्या उद्भवू शकतात. जरी हिवाळ्यात पाणी पिणे उन्हाळ्याच्या हवामान एवढे सोपे नाही. पण तरीही आपल्याला पाणी पिणे आवश्यक आहे, जेणे करून आपले शरीर रोगमुक्त राहील.

हिवाळ्यात किमान तीन ते चार लीटर पाणी प्यावं. बरेच स्त्री रोग तज्ज्ञ मानतात की बायकांनी जास्तीत जास्त पाणी प्यावं, कारण त्यांना मूत्रमार्गाच्या भागातील संसर्गाची समस्या होते. तसेच हे शरीरातील मेटॅबॉलिझ्म म्हणजे चयापचय, पचन आणि शोषण साठी फार महत्त्वाचे असते. सोडियम,युरिया आणि पोटॅशियम सारख्या विषारी घटकांना बाहेर काढण्यासाठी आणि तापमानाला सामान्य ठेवण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. जरी शरीर बरेच दिवस अन्ना शिवाय राहू शकतो पण पाण्याच्या शिवाय जगणे कठीण आहे.

उन्हाळ्यात घामाच्या रूपात पाणी शरीरातून निघून जातो. म्हणून आपण अधिक पाणी पितो. परंतु हिवाळ्यात परिस्थिती वेगळी असते. तरीही पाणी भरपूर प्यावं. त्वचेच्या सौंदर्याला टिकवून ठेवण्यासाठी पाणी मदत करतं. हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते, ह्याचे कारण पाण्याची कमतरता देखील असते. हेच नव्हे तर वयाच्या पूर्वीच सुरकुत्या पडणे देखील पाण्याच्या अभावी होते.

पुरेसे पाणी प्यायल्यानं वजन नियंत्रित राहते.आपल्या आहारात काकडी, खरबूज, कलिंगड सारख्या फळांना समाविष्ट करून आणि हिवाळ्यात अनेक प्रकारच्या हिरव्या पालेभाज्या खाल्ल्याने शरीराला पुरेसे पाणी मिळते. उन्हाळा असो किंवा हिवाळा दोन्ही हंगामात पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान नियंत्रित राहते. हेच नव्हे तर हिवाळ्यात थंड हवामान असल्याने आणि थंड कोरडे वारे असल्याने उन्हाळ्याच्या अपेक्षा जास्त सुस्तपणा जाणवतो. पण पाणी प्यायल्याने आपण ताजेतवाने होतो. महत्वाची सूचना: सदर लेखातील माहिती, विविध तज्ज्ञांच्या अभ्यास व मतांनुसार तसेच सर्वसामान्य मनुष्याच्या आरोग्यास अनुसरून देण्यात आलेली आहे. ही माहिती देण्यामागे, या विषयाची प्राथमिक ओळख होणे हा उद्देश आहे. वाचकांनी कोणताही निर्णय घेण्याआधी, आपल्या आरोग्याला अनुसरून, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा; अधिसूचना महाराष्ट्राला सुपूर्द

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**दिल्ली/प्रतिनिधी** – मराठी भाषेला अभिजात भाषेचा मान मिळाल्याबाबतची अधिसूचना आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे सुपूर्द केली असल्याची माहिती मंत्री श्री. सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे, अभिजात भाषा पाठपुरावा समितीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवळ व राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे उपस्थित होते.

मराठी भाषेला मान मिळाल्याचा अभिमान –

मंत्री श्री. सामंत यांनी या ऐतिहासिक प्रसंगी आनंद व्यक्त करत पत्रकारांना सांगितले की, ११ वर्षांपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव पाठवला होता. तेव्हा ते मराठी भाषेचे राज्यमंत्री होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात रेझिंग डे संपन्न, दिघी सागरी पोलिसांचं मार्गदर्शन




**दै. आवाज वृत्तसेवा...**

**बोर्लीपंचतन । मकरंद जाधव/प्रतिनिधी** – महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या निमित्ताने श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या वतीन 'रेझिंग डे' सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं. त्याच अनुषंगाने दिघी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार दि.७ जानेवारी रोजी रेझिंग डे आयोजित करण्यात आला. शपोलिसांचा जनतेशी असणारा संपर्क वाढावा,तो अधिक वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना चोवीस तास ऑन ड्युटी असणाऱ्या पोलिसांचं कामकाज कसं चालतं याविषयी माहिती दिली. आता प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाईलमुळे डिजिटल पेमेंट म्हणजेच ऑनलाइन आर्थिक व्यवहार वाढले आहेत हीच संधी साधून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे चोरटेदेखील आता ऑनलाईन पद्धतीने आर्थिक फसवणूक करुन आपल्या बँक खात्यातील पैसे क्षणात गायब करीत आहेत.त्याबाबत आपण सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याबाबत जागरुकता निर्माण होऊन बाल लैंगिक शोषणाच्या घटना टाळण्यासाठी मोलाचं मार्गदर्शन करतानाच तुमच्या बाबतीत काही चुकीचं घडत असेल तर तुम्ही पोलिसांकडे या आम्ही तुम्हाला नक्कीच मदत करु असा विश्वास देतानाच कोणतीही चांगली वाईट गोष्ट लपवून न ठेवता आई-वडील शिक्षक आणि मित्र-मैत्रिणींजवळ बोला असा सल्ला दिला.याप्रसंगी पोलीस कर्मचारी उल्हास चौलकर,शाळा व्यवस्थापन समितीचे चंद्रमणी मोरे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता सातवी ते बारावीचे विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन मिसबा पुरकर यांनी तर विद्यार्थ्यांजवळ संवाद साधून विविध विषयांवर केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मुख्याध्यापक सचिन मापुस्कर यांनी पोलिस प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

# इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनाचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**न्यायडोंगरी** – दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी लोकनेते कै.अॅड. विजय शिवराम आहेर हायस्कूल व जुनिअर कॉलेज नायडोंगरी विद्यालयातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्याना व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमाअंतर्गत नवोदयन अकॅडमी चाळीसगाव यांच्या मार्फत वर्धा येथील प्रेरणादायी वक्ते सुमित ऊरकुडकर (कार्पोरेट ट्रेनर,सॉफ्ट स्किल ट्रेनर,करीयर काऊंसलर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.यात विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन,उज्वल भविष्याच्या दृष्टीने विविध शाखांची निवड,विद्यालयीन शिस्त अश्या अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

मान्यवर सुमित ऊरकुडकर आणि नवोदयन कडमी चाळीसगाव येथील अमित वाजपेयी यांचा सत्कार विद्यालया तर्फे प्राचार्या सौ.पी.व्ही. आहेर,उपमुख्याध्यापिका सौ.आर.ए.सोनगीरे, पर्यवेक्षक टी. ई.मवाळ यांनी केला.

यावेळी उपस्थित विद्यालयाच्या प्राचार्या सौ.पी.व्ही.आहेर, उपमुख्याध्यापिका सौ.आर.ए.सोनगीरे, पर्यवेक्षक टी.ई.मवाळ शिक्षक, शिक्षिका आणि विदयार्थी उपस्थित होते.

# महिरावणी येथे मातोश्री गि.दे.पाटील विद्यालयात आनंद मेळा उत्साहात साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक –** महिरावणी येथील मातोश्री गीताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर व्यावहारीक ज्ञान कळावे तसेच त्यांना अन्नपदार्थांची माहिती व्हावी यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली आनंद मेळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मेळाव्याचे उद्घाटन दुडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यालयाचे सेवानिवृत्त बाळासाहेब चव्हाण तसेच वरिष्ठ लिपिक खंडू लांबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या मेळाव्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

यावेळी विद्यार्थ्यांना अन्नपदार्थांची माहिती व्हावी तसेच अन्नपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या घटक पदार्थांची माहिती व्हावी आणि त्याची कृती समजावी. सोबतच अन्नपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या कष्टाची जाणीव व्हावी तसेच व्यावहारिक ज्ञान कळावे. आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयातील इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते. तसेच विविध फनी गेम्सचे स्टॉल, बौद्धिक खेळाचे स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील उपशिक्षक संजय पवार, संजय गायकवाड,समाधान शेवाळे,अश्विनी चौरे,दिपाली वाडीले,दिलीप खांडबहाले, विलास येवले यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आनंद मेळ्याचे सुंदररित्या नियोजन विद्यालयातील उपशिक्षक देवेंद्र देवरे यांनी करत शेवटी आभार प्रदर्शन केले.

# नाशिकरोड करांच्या समस्या सोडवा : उत्तुंग झेप चे अध्यक्ष रोहन देशपांडे यांचे नाशिक रोड विभागाला साकडे



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**विश्वजीत शहाणे, नाशिकरोड /प्रतिनिधी :–** नाशिक रोड विभागिय कार्यालय येथे उत्तुंग झेप फाउंडेशनचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे सदस्य रोहन देशपांडे यांच्यासह शिष्टमंडळाने नागरिकांच्या विविध समस्येच्या प्रश्नासंदर्भात विभागीय अधिकारी श्री चंदन घुगे व संबंधित अधिकारी आणि त्या विभागाचे प्रतिनिधी यांसोबत सखोल चर्चा करून निवेदन देण्यात आले. अनेक महिन्यांपासून नाशिक महानगरपालिका नाशिक रोड विभागातून रखडलेल्या नागरी समस्यांबाबत संपूर्ण पाढाच वाचण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने प्रमुख रस्त्यांवरील पडलेले खड्डे, अनधिकृत फेरीवाल्यांची वाढलेली संख्या, रस्त्यावरचे थांबलेले डांबरीकरण, नाशिक रोड विभागातील सर्व स्वच्छतागृहांची दुरावस्था, प्रमुख रस्त्यांवरील पुसलेले पांढरे पट्टे व त्यावरील चमकणारे रेडियम यामुळे दळणवळणामध्ये होणारा अडथळा, फुटपाथ वर व्यवसायिकांची वाढलेली गर्दी, वाहतूक बेटांची झालेली दुरावस्था, रस्त्यावरील स्ट्रीट पार्किंगचा प्रश्न, उद्यानांमधील अस्वच्छता, बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे, दत्त मंदिर, वास्को चौक, मीना बाजार, गायकवाड मळा, छत्रपती शिवाजी चौक आणि गायकवाड मळा येथील रहदारी चा प्रश्न अशा विविध संबंधित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा संपन्न झाली.

नाशिककडून विभागीय अधिकारी श्री चंदन घुगे याचबरोबर आरोग्य विभाग,पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, विविध कर विभाग, पाणीपुरवठा विभाग, वीज पुरवठा विभाग, अतिक्रमण विभागातील अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

नागरिकांच्या वतीने रोहन देशपांडे यांच्या शिष्टमंडळ समवेत हेमंत गाडे, जमदाडे, अमृत शिरसाठ, अखिल कादरी आकाश शिलावत, अथर्व पाठक, विनीत सातपुते, हेमंत जाधव,सौ. प्रियंका पटेल सौ.सविता सोनवणे, सौ.हंसा भगत आधी नागरिक उपस्थित होते. सदर कामं विषयक सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून लवकरात लवकर कामे मार्गे लागतील विभाग अधिकारी यांच्या मार्फत देण्यात आले.

वेळेत कामे पूर्ण न झाल्यास त्यांची भेट घेण्याचा इशारा रोहन देशपांडे यांच्या शिष्टमंडळाच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आला.

# श्रमाचे महत्त्व ओळखा–अमित बोरसे




**दै. आवाज वृत्तसेवा...**

**बोर्लीपंचतन । मकरंद जाधव/ प्रतिनिधी –** येथील म.वि.प्र. समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योज–नेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे कळमदरी तालुका नांदगाव येथे सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी श्रमाचे महत्त्व ओळखून श्रमदान करावे श्रमामुळे सामाजिक परिवर्तन होते. श्रमदान करत असताना आपल्यातील सर्व भेद नष्ट होतात व आपण राष्ट्राच्या उन्नतीसाठी एकत्र येतो. राष्ट्र व समाज परिवर्तनासाठी आजचा युवक सक्षम झाला पाहिजे असे मत मविप्र संचालक अमित बोरसे पाटील यांनी व्यक्त केले. याप्रसंगी उप प्राचार्य डॉ. संजय मराठे, कळमदरी ग्रामपंचायत सरपंच डॉ. विशाल पगार, सत्यजित पगार, प्राचार्य डॉ. आर. एम. भवरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व्यासपीठावर देविदास पगार, ग्रामपंचायत सदस्य श्रीमती अंजनाबाई पगार, मविप्र सभासद पांडुरंग पगार, देवेंद्र देसले, शेखर पगार ,राहुल पगार, सुनील पगार, वि.का.सो. चेअरमन हितेंद्र पगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी.पी. मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती पूजा जाधव व आभार डॉ बी. एम. अहिरे यांनी मांनले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# या भेटीत दडलंय काय?

## सटाणावासीयांना औत्सुक्य!



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी:– –** सटाणा शहर पुनद पाणीपुरवठा योजनेचे भवितव्य अधांतरी अडकले असताना अतिशय गोपनीयरित्या उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून सटाणावासीयांचा जीवन मरणाचा प्रश्न सोडविणारे सामाजिक कार्यकर्ते ॲड.दीपक सोनवणे यांनी नुकतीच मुंबई येथे मंत्रालयात भाजपाचे नेते माजी खा–सदार किरीट सोमय्या यांची भेट घेतली.या भेटीदरम्यान उभयतांनी १५ ते २० मिनिटे चर्चा केली असून या भेटीत नेमके दडलेय काय? असा प्रश्न सटाणावासीयांना पडला आहे.

सटाणा शहरवासीयांसाठी महत्त्वकांक्षी ठरलेल्या पुनद पाणीपुरवठा योजनेला ५५ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला. परंतु प्रत्यक्ष काम सुरू होताच कळवणवासीयांनी पाणी नेण्यास जोरदार विरोध केला.कळवण येथील सर्वपक्षीय पुढार्यांनी आणि जनतेने तीव्र विरोध केल्यानंतर सटाणावासीयांचे तोंडचे पाणी पळाले होते.परंतु याचवेळी तत्कालीन नगराध्यक्ष सुनील मोरे यांचे निकटवर्तीय सामाजिक कार्यकर्ते ड.दीपक सोनवणे यांनी अतिशय गोपनीयपणे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

स्वतः कायद्याचे पदवीधर असलेल्या ॲड. सोनवणे यांनी सातत्याने अभ्यासपूर्ण पाठपुरावा केल्याने त्यांच्या बाजूने निकाल लागला. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सटाणावासीयांना पुनदचे पाणी मिळण्यातील अडसर दूर झाला.तेच ॲड. सोनवणे हे काही कामानिमित्त मुंबई येथे मंत्रालयात गेले असताना गेल्या आठवड्यात त्यांची भाजपाचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्याशी भेट झाली.या भेटीदरम्यान दोघांमध्ये १५ ते २० मिनिटे सविस्तर चर्चा झाली.सोमय्या हे वेगवेगळी भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढण्यासाठी ओळखले जातात.त्यामुळे ॲड.सोनवणे यांनी या भेटीदरम्यान सोमय्या यांच्याशी नेमक्या कुठल्या विषयावर चर्चा केली? याबाबत औत्सुक्य निर्माण झाले आहे.याबाबत दस्तरखुद्द ड.सोनवणे यांच्याकडे विच–ारणा केली असता त्यांनी भेट झाल्याचे कबूल केले. परंतु या दरम्यान नेमक्या कोणत्या विषयावर चर्चा झाली याबाबत त्यांनी बोलणे टाळले आहे.यामुळे साहजिकच सटाणा शहरासह तालुकाभरात याविषयी चर्चा होत असून या भेटीत नेमके काय दडले आहे? हे येणारा काळच सांगणार आहे.

## माझे ..

एकनिष्ठवा–यावरती
परक्या मानले माझे
उपकृत केले कायम
मनावर असह्यओझे

प्रभाव पडेना जनते
पावसात तुडुंब भिजे
कळले नाही कसले
कट कारस्थान शिजे

गळे कापले केसांनी

असूनही डोस्के गंजे
बेसावध ठेवलेआम्हां
कळले ना छक्केपंजे

उसवली गेली बटने
अस्ताव्यस्त ते काजे
उघडे पडे कारस्थान
स्वता स्वताशी लाजे

धाडस पाहून सरांचे
साहसकरायला धजे

चित्र चितारुन ठेवले
पक्षाच्या विजयध्वजे
रात्रंदिवस कार्यमग्न
काही पळभरी निजे
छत्री साहेबा डोईवर
सटसट पाय रे भाजे

उत्सव श्रेष्ठीच्या घरा
आमचे मोहल्ले सजे
पिढ्यापिढ्याचालले
गुलाम आमचे आजे

**आवाज वृत्तसेवा – हेमंत मुसरीफ, पुणे. मो. ९७३०३०६९९६**







